**नियमित फौजदारी खटला क्रं.६१८/२०२०**
आर.पी.एफ.दिवा, गु.र.नं.३३८/२०२०
निशाणी क्रं.२०

MHTH110006892020

**न्यायनिर्णय**
(दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी घोषित)

१. प्रस्तुतचा खटला **आरोपी मोहम्मद कलीम मोहम्मद नसिर सिध्दीकी** विरुद्ध भारतीय लोहमार्ग कायदा कलम १४३ अन्वये दाखल केलेली आहे. आज दिनांक २३/०४/२०२६ रोजी आरोपीने स्वत:हुन गुन्हा कबुल करुन निशाणी क्र. १७ वर गुन्हा कबुलीचा अर्ज दिला. आरोपीने स्वखुशीने गुन्हा कबुल केल्याबाबत खात्री करुन मी निशाणी क्र.१८ वर आरोपीवर दोषारोप ठेवला. त्याप्रमाणे निशाणी क्र. १९ वर आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले.

**२.** प्रस्तुत प्रकरणात दिनांक २७/०१/२०२० रोजी १२.०० वा. च्या मिस्बा टूर ॲण्ड ट्रॅव्हल्सचे दुकान भिवंडी, जि.ठाणे येथे आरोपीने त्याच्याकडे कोणताही वैध्य परवाना नसतांना आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर वैयक्तिक खाते तयार करुन रेल्वे गाडयांची ई—तिकीटे काढली व ती तिकीटे गरजू व्यक्तींना प्रति रु. २५०/— ते ३००/— जादा दराने विकुन रेल्वे तिकीटांचा काळाबाजार करतांना मिळुन आला त्यामुळे आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियमाखालील तरतुदींचा लाभ देणे उचित होणार नाही.

**३.** प्रस्तुत गुन्हा त्यांचा पहिलाच गुन्हा असल्याचे आरोपीने सांगितले व ते सदर गुन्हा परत करणार नाहीत असे त्यांनी आश्वासन दिले. त्यामुळे आरोपीवर दंडात्मक कारावई करणे न्यायोचित होईल करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १) | **आरोपी मोहम्मद कलीम मोहम्मद नसिर सिध्दीकी** हयास भारतीय रेल्वे कायदा कलम १४३ च्या गुन्हयासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २६४ अन्वये दोषी ठरविण्यात येते. |
| २) | आरोपीला भारतीय रेल्वे कायदा कलम १४३ च्या गुन्हयासाठी रु.१०,०००/— (रु.दहा हजार मात्र) दंड व दंडाची रक्कम न भरल्यास आरोपीला एक महिना साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. |
| ३) | आरोपीने न्यायालयात जमा केलेली दंडाची रक्कम रेल्वे प्रशासनास देण्यात यावी. |
| ४) | प्रस्तुत प्रकरणातील जप्त तिकीटे व आरक्षण फॉर्म मुल्यहिन व निरुपयोगी असल्याने नष्ट करण्यात यावीत. तसेच जप्त एक एच.पी. कंपनीचा लॅपटॉप, प्रिंटर व रेडमी नोट ४ कंपनीचा मोबाईल इ.चा आरोपीस ताबा देण्यात यावा. |
| ५) | आरोपीला निकालपत्राची छायांकित प्रत विनामुल्य व त्वरीत देण्यात यावी. |
| ६) | सदर प्रकरण निकाली काढण्यात आले. |

VISHWAS PANDURANG SHINDE

Digitally signed by VISHWAS PANDURANG SHINDE
Date: 2026.04.23 17:28:09 +0530

(व्ही.पी.शिंदे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग लोहमार्ग
लोहमार्ग न्यायालय, कल्याण

कल्याण
दिनांक : २३/०४/२०२६